व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमितता व आर्थिक भ्रष्टाचार तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock -१५०० खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहारबाबत सखोल चौकशी करण्यासाठी चौकशी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक:व्यशिअ-२०१५/(३८७/१५)/व्यशि-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: २९ नोव्हेंबर, २०१७.

<u>संदर्भ</u>:-१) संचालक, (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १/व्हीओसी/२०१४/०४०, दि.१८.१०.२०१४.
२) संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.१६/ व्यशिप्रशि/ २०१५/२६५, दि.१०.१२.२०१५.
३) संचालक (प्रशिक्षण) (सेवा व लेखा विषयक बाबी), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.१/तक्रार/२०१५/४१, दि.२२.१२.२०१५.

<u>प्रस्तावाना:</u>

तत्कालीन संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१८.१०.२०१४ च्या पत्रान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन आर्थिक भ्रष्टाचार झाल्याबाबत शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तसेच शासनाच्या वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करुन या प्रकरणी चौकशी समिती नेमून कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. याशिवाय तत्कालीन संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वरील संदर्भ क्र.२ येथील दि.१०.१२.२०१५ च्या पत्रान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock-१५०० या खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तसेच शासनाच्या वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केलेले आहेत. तसेच वरील संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये तत्कालीन संचालक (प्रशिक्षण) (लेखा व सेवाविषयक बाबी)

यांनी संदर्भ क्र.२ येथील दि.१०.१२.२०१५ च्या पत्राच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी शासन स्तरावर उच्चस्तर समितीकडून चौकशी करण्याची विनंती शासनास केली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत दोन्ही प्रकरणांची सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी चौकशी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन आर्थिक भ्रष्टाचार झाल्याबाबत तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock-१५०० खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहार या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्यात येत आहे:-

१.	अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई	अध्यक्ष
२.	उपसंचालक, (मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	सदस्य
३.	सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.	सदस्य
४.	उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (खरेदी प्रक्रिया विषयाशी संबंधित)	सदस्य सचिव

२. सदर चौकशी समितीची समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

१) संदर्भाधीन क्र.१ येथील नमूद तत्कालीन संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.१/व्हीओसी/ २०१४/०४०, दि.१८.१०.२०१४ अन्वये सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात प्रशासकीय व वित्तीय अनियमितता तसेच निविदा प्रक्रियेत पुरवठादारांशी संगनमत करुन शासकीय निधी अंदाजे रु.१००.०० कोटी पेक्षा अधिक गिळंकृत केल्यासंदर्भात शासनास सादर केलेल्या अहवालाची तपासणी करुन अहवालामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची चौकशी करणे.

२) संदर्भाधीन क्र.२ येथील नमूद तत्कालीन संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.१६/व्यशिप्रशि/२०१५/ २६५, दि.१०.१२.२०१५ अन्वये सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock-२०१५ खरेदी संदर्भात शासनास सादर

केलेल्या अहवालाची तपासणी करुन अहवालामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची चौकशी करणे.

३) उपरोक्त क्र. १) व २) येथील प्रकरणी सदर यंत्रसामुग्री खरेदी करतेवेळी यंत्रसामुग्री खरेदीसाठी, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या शासनाच्या नियमानुसार / मार्गदर्शक तत्वानुसार याप्रकरणी खरेदी प्रक्रियेचा तसेच निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात आला होता किंवा कसे? याबाबतची तपासणी करणे.

४) उपरोक्त क्र. १) व २) येथील प्रकरणी सदर खरेदी प्रक्रीयेमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाल्याचे स्पष्ट झाल्यास सदर अनियमिततेस कारणीभूत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन अहवाल शासनास सादर करणे.

३. सदर चौकशी समितीस सर्व आवश्यक ती कागदपत्रे उपसंचालक, खरेदी प्रक्रिया /निविदा प्रक्रिया तथा चौकशी समितीचे सदस्य सचिव यांनी उपलब्ध करुन द्यावीत.

४. उपरोक्त समितीने त्यांचा अहवाल दोन महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

५. सदर समितीला कामकाज करण्यासाठी एक कक्ष व आवश्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७११२९१६२४११५४०३ हा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2017.11.29 16:26:48 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२) उपसंचालक, (मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना), उद्योग संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.

४) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (खरेदी प्रक्रिया विषयाशी संबंधित), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

३) मा.सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४) मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव.

५) मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता) यांचे खाजगी सचिव.

६) उप सचिव (व्यशि), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

७) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

८) निवड नस्ती (व्यशि-१).